मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » गुरुवार, दि.7 नोव्हेंबर 2024 | पान- 1

# राष्ट्रवादी महायुतीचे उमेदवार अण्णा बनसोडे यांच्या जाहीरनाम्याचे प्रकाशन

## प्रचार फेरीला उत्स्फूर्त प्रतिसाद : प्रकाशन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते करण्यात आले.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी मतदार संघातील महायुती राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार आमदार अण्णा बनसोडे यांच्या जाहीरनाम्याचे प्रकाशन बुधवारी दापोडी येथे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते ऑनलाइन पद्धतीने करण्यात आले. यानंतर आमदार बनसोडे यांच्या प्रचारार्थ दापोडीत भव्य प्रचार फेरी काढण्यात आली.

बुधवारी सकाळी ११ वाजता राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांच्या हस्ते ऑनलाइन पद्धतीने व महायुतीच्या सर्व प्रमुख नेत्यांच्या उपस्थिती मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष व पिंपरी विधानसभेचा जाहीरनामा ऑनलाइन पद्धतीने प्रकाशित करण्यात आला.



त्यानंतर पिंपरी विधानसभा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी व महायुतिचे अधिकृत उमेदवार आ. अण्णा बनसोडे यांच्या प्रचारार्थ फिरंगाई देवीचे दर्शन घेऊन दापोडी गावातून प्रचार फेरीला सुरुवात करण्यात आली. प्रचार फेरी सिद्धार्थ नगर, नरवीर तानाजी पुतळा, पवार वस्ती, एसएमएस कॉलनी, आतार वीटभट्टी, महाविहार, काचीवाडा, फुलेनगर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, खालची आळी विठ्ठल मंदिर,समर्थ व्यायाम शाळा, शिवम मित्र मंडळ, आझाद मित्र मंडळ, वरची आळी विठ्ठल मंदिर, ११ नंबर बस स्टॉप, मंत्री कॉम्प्लेक्स, सुंदर बाग, गणेश गार्डन या मार्गाने प्रचार फेरी काढण्यात आली. या प्रचार फेरीत आमदार अण्णा बनसोडे, आरपीआय आठवले गटाच्या महिला प्रदेशाध्यक्ष चंद्रकांता सोनकांबळे, शहराध्यक्ष कुणाल वाव्हळकर, महायुतीचे समन्वयक भाजपचे नेते सदाशिव खाडे, आमदार उमा खापरे, अमित गोरखे, ज्येष्ठ नेते उमेश चांदगुडे, काँग्रेसचे शहराध्यक्ष योगेश बहल, महिला अध्यक्षा कविता आल्हाट, ज्येष्ठ नेते ज्ञानेश्वर कांबळे, नेते नंदू कदम, माजी उपमहापौर केशव घोळवे, राष्ट्रवादी राष्ट्रवादी युवक अध्यक्ष शेखर काटे, माजी नगरसेवक अविनाश काटे, संतोष कुदळे, संजय काटे, माई काटे, वैशाली काळभोर, सुजाता पालांडे, शिक्षण मंडळाचे माजी सभापती फजल शेख, शिवसेनेचे नेते इरफान सय्यद, सरिता साने, कष्टकरी कामगार नेते बाबा कांबळे, संदीपान झोंबाडे, तसेच महायुतीचे कार्यकर्ते सीमा बोरसे, सीमा चव्हाण, वैशाली वाखारे, सोनाली सायकर, प्रतिभा जवळकर, जयश्री नवगिरे, अश्विनी कांबळे, अश्विनी पोळ, आशा शिंदे, सविता धुमाळ, कविता खराडे तसेच यशवंत कोळेकर, रामदास भांडे, उमेश तांबोळी आदी सहभागी झाले होते

### जाहीरनाम्यातील आश्वासने

» संपूर्ण मतदारसंघात मेट्रोचे जाळे, चाकण, तळवडे व हिंजवडी परिसर जोडणारा मेट्रो मार्ग उभारणे.
» विधानसभा क्षेत्रातील सर्व झोपडपट्ट्यांचे पुनर्वसन.
» वाढती लोकसंख्या विचारात घेऊन पाण्याचे नियोजन.
» वल्लभनगर एसटी स्टँड चा पुनर्विकास.
» छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवन चरित्रावर थीम पार्क.
» शहरात अंडरवॉटर जागतिक दर्जाचे मत्स्यालय उभारणे.
» मतदार संघातील पाच रेल्वे स्टेशनचे सुशोभीकरण.
» अपंग निराधार वृद्ध यांच्यासाठी शहरांमध्ये होम स्टे.
» जनसंपर्क कार्यालयात २४/७ टोल फ्री कॉल सेंटरची उभारणी.
» पिंपरी येथे माता रमाई स्मारक.
» निगडी येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे स्मारक पिंपरी गावात महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांचे स्मारक उभारणे.
» हाफकीन संस्थेतील चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांसाठी स्वतंत्र घरकुल योजनेची उभारणी.

# इम्पिरीअल रुग्णालयाच्या हलगर्जीपणामुळे दोन वर्षाच्या बाळाचा मृत्यू

## तीन डॉक्टरांसह दोन परिचारिकांच्या विरोधात गुन्हा दाखल...

**पिंपरी | प्रतिनिधी**

चिखलीतील इम्पिरीअल रुग्णालयात पायाजवळ वॉर्मर मशीन ठेवल्याने गुडघ्याखालील पाय जळल्याने दोन वर्षाच्या बाळाचा मृत्यू झाला होता. हि घटना १८ नोव्हेंबर २०२३ रोजी घडली होती. ससून रुग्णालयातील समितीच्या अहवालात उपचारात हलगर्जीपणा झाल्याचे निष्पन्न झाल्याने तीन डॉक्टरांसह दोन परिचारिकांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दिरांश रमाकांत गादेवार (वय २) असे मृत्यूमुखी पडलेल्या मुलाचे नाव आहे. याबाबत त्याची आई दीपाली गादेवार (वय ३६, रा. नेवाळेवस्ती, चिखली) यांनी मंगळवारी (दि. ५) चिखली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी डॉ. जितेश मदनसिं दाभोळ, डॉ. रजनिश जगदंबाप्रसाद मिश्रा, डॉ. रोहन प्राणहंस माळी, परिचारिका रेचल अनिल दिवे, सविता नंदकिशोर वरवटे यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




फिर्यादी दीपाली यांच्या मुलाला सर्दी झाल्याने त्यास डॉ. दाभोळ यांच्या सल्ल्यानुसार नेवाळेवस्ती, चिखली येथील इम्पिरीअल रुग्णालयात दाखल केले होते. बाळाचे सॅम्पल घेण्यासाठी डॉक्टर आले. त्यांनी दिरांश याच्या आईला बाहेर थांबण्यास सांगितले. त्यानंतर सकाळी आठ वाजताच्या सुमारास दीपाली या पुन्हा मुलाजवळ आल्यानंतर बाळाच्या पायाजवळ ठेवलेल्या वार्मर मशीनमुळे बाळाचा गुडघ्याखाली पाय पूर्णपणे जळाला असल्याचे त्यांना दिसले होते.

> “ दवाखान्याच्या निष्काळजीपणामुळे एका लहान मुलाचा मृत्यू झाला. मयत मुलाच्या मातेने न्यायासाठी धडपड केली. त्या मातेच्या दोन वर्षाच्या अथक प्रयत्नाला अखेर यश आले. आज दोन वर्षानंतर घटनेला जबाबदार रुग्णालयातील डॉक्टरांसह परिचारिकांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अशा प्रकारच्या घटना पुन्हा घडू नयेत यासाठी शहरातील सर्वच रूग्णालयांनी काळजी घेणे आवश्यक आहे.
> - मा. अमित गोरखे, आमदार विधानपरिषद...

# महायुतीचे सुनील शेळके यांचे गावोगावी उत्साहात स्वागत

## सरकारला कोंडीत पकडायचं प्रयत्न फसल्यानंतर आता हे आंदोलन मागे घ्यावे लागले आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

मावळ विधानसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार सुनील शेळके यांच्या प्रचार दौऱ्याला उर्से गावातून सुरवात झाली. गुलाबाच्या पाकळ्यांनी पायघड्या घालून, बैलगाडीतून मिरवणूक काढून त्यांचे स्वागत करण्यात आले. प्रचार दौऱ्यात गावोगावी महिलांचा सहभाग लक्षणीय होता.

उर्से, आढे, ओझर्डे, सडवली, बऊर, राऊतवाडी, लोखंडवाडी, बेडसे, करूंज, कडधे, येळसे, शेवती वसाहत, प्रभाचीवाडी, सावंतवाडी, महागाव, निकमवाडी, दत्तवाडी, मालेवाडी या गावांना त्यांनी भेट दिली. प्रत्येक गावात ढोल-लेझीम वाजवत फुलांच्या पायघड्या, फुलांचा वर्षाव करीत शेळके यांचे स्वागत केले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष गणेश खांडगे, गणेश ढोरे, विठ्ठलराव शिंदे, साहेबराव कारके, संजय बाविस्कर यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी उपस्थित होते.



आढे गावात आमदार सुनील शेळके यांचे ढोल ताशाच्या गजरात फुलांची उधळण करत स्वागत करण्यात आले. यावेळी सरपंच सुनीता ज्ञानेश्वर सुतार, मयीनाबाई ठाकर, भामाबाई सुतार, जालिंदर बोत्रे, सुवर्णा तिडके, ज्ञानेश्वर ऊर्फ पिंटू सुतार आदी उपस्थित होते.

आमदार सुनील शेळके म्हणाले, “गेल्या तीस वर्षात तालुक्यात जो विकास झाला नाही, तो मी पाच वर्षात करून दाखवला आहे. आमदार म्हणून केलेले काम संपूर्ण तालुक्याने पाहिले आहे. त्यामुळे महिला वर्ग, तरुण, ज्येष्ठ नागरिक हे माझ्या प्रचारात उत्साहाने भाग घेत आहेत.”



# विधानसभा मतदार संघातील मतदान केंद्रांच्या ठिकाणात बदल

## विधानसभा मतदार संघात 14 मतदान केंद्र जवळपास असलेल्या पक्क्या इमारतींमध्ये स्थलांतरीत करण्यात आली आहेत.

**पुणे | प्रतिनिधी**

भारत निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार लोकसभा सार्वत्रिक निवडणूक -२०२४ च्या वेळी वडगांवशेरी विधानसभा मतदार संघात पत्राशेड किंवा तात्पुरत्या स्वरूपात उभे करण्यात आलेले १४ मतदान केंद्र जवळपास असलेल्या पक्क्या इमारतींमध्ये स्थलांतरीत करण्यात आली आहेत. मतदारांनी झालेल्या बदलाची नोंद घेऊन आपापल्या मतदान केंद्रावर मतदान करावे, असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी सचिन बारवकर यांनी केले आहे. या विधानसभा मतदारसंघातील लोहगाव, धानोरी, विश्रांतवाडी आणि येरवडा या प्रमुख भागातील काही मतदान केंद्र स्थलांतरीत करण्यात आली आहेत.

**धानोरी येथील ठिकाणे बदललेली मतदान केंद्रे:**

मतदान केंद्र क्रमांक ५५ कै. बाबुराव माधवराव टिंगरे पुणे मनपा मुलांची आणि मुलींची शाळा क्र. १६४ धानोरी गावठाण पश्चिमेकडील पत्रा शेड खोली क्र. ६ येथे असणारे मतदान केंद्र न्यूरॉन लॅब्स स्कूल सीबीएससी सेंटर, सर्वे नं. १९, धानोरी –लोहगाव रोड, विठ्ठल-रूक्मिणी मंदिराच्या मागे, धानोरी-१५ खोली क्र. १ येथे स्थलांतरीत करण्यात आले आहे. मतदान केंद्र क्रमांक ५६ कै. बाबुराव माधवराव टिंगरे पुणे मनपा मुलांची आणि मुलींची शाळा क्र. १६४ धानोरी गावठाण पश्चिमेकडील पत्रा शेड खोली क्र. ७ हे मतदान केंद्र न्यूरॉन लॅब्स स्कूल सीबीएससी सेंटर, सर्वे नं. १९, धानोरी –लोहगाव रोड, विठ्ठल-रूक्मिणी मंदिराच्या मागे, धानोरी-१५ खोली क्र. २ असे राहील.

मतदान केंद्र क्रमांक ५७ कै. बाबुराव माधवराव टिंगरे पुणे मनपा मुलांची आणि मुलींची शाळा क्र. १६४ धानोरी गावठाण पश्चिमेकडील पत्रा शेड खोली क्र. ८ हे मतदान केंद्र न्यूरॉन लॅब्स स्कूल सीबीएससी सेंटर, सर्वे नं. १९, धानोरी-लोहगाव रोड, विठ्ठल-रूक्मिणी मंदिराच्या मागे, धानोरी-१५ खोली क्र. ३ असे राहील. मतदान केंद्र क्रमांक ५८ कै. बाबुराव माधवराव टिंगरे पुणे मनपा मुलांची आणि मुलींची शाळा क्र. १६४ धानोरी गावठाण पश्चिमेकडील पत्रा शेड खोली क्र. ९ हे मतदान केंद्र न्यूरॉन लॅब्स स्कूल सीबीएससी सेंटर, सर्वे नं. १९, धानोरी-लोहगाव रोड, विठ्ठल-रूक्मिणी मंदिराच्या मागे, धानोरी-१५ खोली क्र. ४ असे राहील. मतदान केंद्र क्रमांक ५९ कै. बाबुराव माधवराव टिंगरे पुणे मनपा मुलांची आणि मुलींची शाळा क्र. १६४ धानोरी गावठाण पश्चिमेकडील पत्रा शेड खोली क्र. १० हे मतदान केंद्र न्यूरॉन लॅब्स स्कूल सीबीएससी सेंटर, सर्वे नं. १९, धानोरी-लोहगाव रोड, विठ्ठल-रूक्मिणी मंदिराच्या मागे, धानोरी-१५ खोली क्र. ५ असे राहील.

मतदान केंद्र क्रमांक ८४ कै. वसंतराव आनंदराव टिंगरे मनपा शाळा क्र. १५६ भैरव नगर पुणे, नवीन इमारत धानोरी मैदानातील पत्राशेड खोली क्र. १ हे मतदान केंद्र गोकुलम शाळा, ५१/१५५, धानोरी रोड, भैरवनगर, धानोरी-१५, खोली क्र. १ असे राहील. मतदान केंद्र क्रमांक ८५ कै. वसंतराव आनंदराव टिंगरे मनपा शाळा क्र. १५६ भैरव नगर पुणे, नवीन इमारत धानोरी मैदानातील पत्राशेड खोली क्र. २ हे मतदान केंद्र गोकुलम शाळा, ५१/१५५, धानोरी रोड, भैरवनगर, धानोरी-१५, खोली क्र. २ असे राहील.




### लोहगाव येथील ठिकाणे बदललेली मतदान केंद्रे

» मतदान केंद्र क्रमांक ४६ संस्कार पब्लिक स्कूल लोहगाव खोली क्रमांक १ हे मतदान केंद्र ब्रिलियंट इंटरनॅशनल प्री स्कूल, आश्रय सोसायटी, बाजारतळासमोर खोली क्रमांक १ असे राहील. मतदान केंद्र क्रमांक ४७ संस्कार पब्लिक स्कूल लोहगाव खोली क्रमांक २ हे मतदान केंद्र ब्रिलियंट इंटरनॅशनल प्री स्कूल, आश्रय सोसायटी, बाजारतळासमोर खोली क्रमांक २ असे राहील. मतदान केंद्र क्रमांक ४८ संस्कार पब्लिक स्कूल लोहगाव खोली क्रमांक ३ हे मतदान केंद्र ब्रिलियंट इंटरनॅशनल प्री स्कूल, आश्रय सोसायटी, बाजारतळासमोर खोली क्रमांक ३ असे राहील. मतदान केंद्र क्रमांक ४९ संस्कार पब्लिक स्कूल लोहगाव खोली क्रमांक ४ हे मतदान केंद्र ब्रिलियंट इंटरनॅशनल प्री स्कूल, आश्रय सोसायटी, बाजारतळासमोर खोली क्रमांक ४ असे राहील.

### विश्रांतवाडी, येरवडा येथील ठिकाणे बदललेली मतदान केंद्रे:

» मतदान केंद्र क्रमांक १६८ आचार्य आत्मवल्लभ इंग्रजी माध्यम शाळा, शांतीनगर, विश्रांतवाडी, पुणे-६, पत्रा शेड खोली क्र. १ हे मतदान केंद्र भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, शांतीनगर, येरवडा असे राहील. मतदान केंद्र क्रमांक ३२९ नेताजी सुभाषचंद्र बोस उच्च माध्यमिक पुणे महानगरपालिका शाळा, पत्रा शेड खोली क्र. ६ हे मतदान केंद्र साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे सांस्कृतिक कला रंगमंदिर, तळमजला पार्किंग, कापडी पार्टीशन, येरवडा, खोली क्र. १, असे राहील. मतदान केंद्र क्रमांक ३३२ नेताजी सुभाषचंद्र बोस उच्च माध्यमिक पुणे महानगरपालिका शाळा, पत्रा शेड खोली क्र. ९ हे मतदान केंद्र साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे सांस्कृतिक कला रंगमंदिर, तळमजला पार्किंग, कापडी पार्टीशन, येरवडा खोली क्र. २, असे राहील.

# विधानसभेच्या मतदानावेळी महिला, ज्येष्ठ नागरिकांना दिलासा

## प्रचारात प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष सहभाग घेतल्यास शिस्तभंगाची कारवाई

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील मध्यवर्ती असणाऱ्या कसबा विधानसभा मतदार संघात या वेळी २६८ मतदान केंद्र आहेत. त्यातील काही ठिकाणे ही वैशिष्ट्यपूर्ण बनवण्यात आली आहेत. याद्वारे प्रामुख्याने महिला आणि ज्येष्ठ नागरिक मतदारांना दिलासा देण्याचे प्रयत्न केले जात आहेत. यात प्रामुख्याने अहिल्यादेवी शाळेमध्ये "पिंक पोलीस स्टेशन' बनवण्यात आले आहे.

येथे महिला कर्मचारीच कार्यरत असणार आहेत. तर, हिरालाल शाळेजवळ असलेल्या हेरिटेज वास्तूमध्ये एक मतदान केंद्र आहे. या वास्तूला अनेक वर्षांचा इतिहास आहे. ही जागा प्रार्थना समाजाची आहे. यासोबतच सर परशुराम भाऊ महाविद्यालयाचे बुथ हे युथ केंद्र असणार आहे. तेथे कार्यरत असणारे सर्व कर्मचारी युवा वर्गातील असतील. तर, याच महाविद्यालयाच्या मागे असलेल्या



दिव्यांग शाळेमध्ये दिव्यांग मतदारांसाठी खास व्यवस्था करण्यात आली आहे. तेथे कार्यरत असणारे कर्मचारीही दिव्यांगच असणार आहेत.

अंथरूणाला खिळून असलेले तसेच मतदान केंद्रावर पोहोचू न शकणारे दिव्यांग अशी १९७ जणांची यादी कसबा विधानसभा मतदार संघाच्या निवडणूक अधिकाऱ्यांकडे आहे. त्यामुळे त्यांच्या घरी जाऊन नियमांचे पालन करून मतदान घेतले जाणार आहे. नेत्रहीन असलेल्या मतदारांना वोटर इन्फर्मेशन स्लीप ही ब्रेल लिपीत दिली जाणार आहे. अशी १०८ मतदारांची नोंद करण्यात आली आहे.

मतदानासाठी लहान मुलांना घेऊन आलेल्या महिलांच्या बाळांसाठी मतदान केंद्रावर पाळणाघरांची व्यवस्था करण्यात आली आहे. तेथे आशा वर्कर्सची मदत घेतली जाणार आहे. या शिवाय गर्भवती, वृद्ध, कडेवर मूल असलेल्या महिलांसाठीही मतदान सुसह्य व्हावे, रांगेत फार काळ उभे रहावे लागू नये यासाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली आहे.

# चिंचवड विधानसभा मतदारसंघातील विकासकामांचा शुभारंभ वाकडमधूनच करणार : शंकर जगताप

## अशी ग्वाही चिंचवड विधानसभा मतदार संघाचे उमेदवार शंकर जगताप यांनी दिली.

**पिंपरी | प्रतिनिधी**

म्हातोबा देवस्थानच्या आशीर्वादाने आणि वाकडवासीयांच्या भरघोस पाठिंब्याने आपण नक्कीच निवडून येणार. त्यानंतर विकासकामांची सुरुवात वाकडच्या म्हातोबा देवस्थान पासूनच करणार, अशी ग्वाही चिंचवड विधानसभा मतदार संघाचे शिवसेना राष्ट्रवादी आरपीआय व मित्रपक्ष महायुतीचे अधिकृत उमेदवार शंकर जगताप यांनी दिले. वाकड गावात प्रचार दौऱ्यात म्हातोबा चरणी लीन होवून मनोभावे माथा टेकवून त्यांनी विजयासाठी आशीर्वाद घेतला. स्व. लक्ष्मणभाऊ जगताप यांनी चिंचवड विधानसभा मतदार संघात गेल्या दहा वर्षात विकासाची गंगा आणली. तोच ध्यास घेवून येणाऱ्या काळात वाकडसह चिंचवड विधानसभेचा कायापालट करणार आल्याचे मत व्यक्त केले. उमेदवार शंकर जगताप यांनी मतदारांच्या गाठी-भेटी, प्रचारफेरीच्या माध्यमातून त्यांनी मतदारांशी संवाद साधला.

चिंचवड विधानसभेत वातावरण काही निराळेच होते. सकाळपासूनच रस्ते अभूतपूर्व गर्दीने ओसंडू लागले.. फटाक्यांची जोरदार आतषबाजी.. फुलांचा वर्षाव.. हलगीचा कडकडाट.. अशा या प्रसन्न वातावरणात चिंचवडकर उत्सुकतेने 'त्यांची' वाट पाहत होते... तेवढ्यात 'ते आले..त्यांनी पाहिलं.. आणि त्यांनी जिंकलं..!' ते होते चिंचवड विधानसभा मतदार संघाचे सर्वाधिक चर्चेतले आणि लोकप्रिय महायुतीचे उमेदवार शंकर जगताप ! जागोजागी त्यांच्या स्वागतासाठी जमलेला जनसमुदाय त्यांच्याशी हस्तांदोलन करीत शुभेच्छांचा वर्षाव करताना दिसला. महिलांनी त्यांचे औक्षण करीत त्यांना आशीर्वाद आणि सदिच्छा दिल्या तर तरुण मुला- मुलींची त्यांच्यासोबत सेल्फी घेण्यासाठी झुंबड उडालेली पाहायला मिळाली.



वाकड गावठाण पासून सुरु झालेल्या या दणदणीत प्रचारफेरीत त्यांच्यासमवेत माजी नगरसेवक संदीप कस्पटे, माजी नगरसेवक विनायक गायकवाड, उपमहाराष्ट्र केसरी विशाल कलाटे, श्रीनिवास कलाटे, अमोल कलाटे, युवा नेते राम वाकडकर, पिंपरी चिंचवड आरपीआयचे शहराध्यक्ष कुणाल वाव्हाळकर, चेतन भुजबळ, बजरंग कलाटे, कालीदास कलाटे, रणजीत कलाटे, संतोष कलाटे, स्नेहा कलाटे, युवा नेते अक्षय कळमकर, धनराज बिर्दा, भारती विनोदे, नितीन इंगवले, गणेश कस्पटे, मुकेश कस्पटे, पियुशा पाटील, प्रसाद कस्पटे, किरण कलाटे, विक्रम कलाटे, विनोद कलाटे, संदीप वाकडकर, निखिल भंडारे, अमर भूमकर, सुरज भुजबळ, अभिमान कलाटे, अक्षय कलाटे, गणेश कळमकर, ॲड. अमोल भुजबळ, सतिश वालगुडे, ॲड. चेतन कलाटे स्वप्निल कलाटे, पंकज भंडारे, सनी कलाटे, योगेश भोसले, बाळा समिंदर, सुजित कांबळे, अविनाश शिरसाठ, सतिश राजे, सचिन लोंढे यांच्यासह मित्र पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शंकर जगतापांच्या विजयासाठी थेरगाव ग्रामस्थांची ‘वज्रमूठ’

## थेरगावच्या विकासाला चालना मिळावी यासाठी शंकर जगताप यांना साथ : पदयात्रेला थेरगावकरांचा तुफान प्रतिसाद

**पिंपरी | प्रतिनिधी**

चिंचवड विधानसभा मतदारसंघातील भाजप-शिवसेना-राष्ट्रवादी- आरपीआय व मित्रपक्ष महायुतीचे अधिकृत उमेदवार शंकर जगताप यांनी आज थेरगाव येथील रॅलीला तुफान प्रतिसाद मिळाला. चैतन्यदायी गीत, ठिकठिकाणी रस्त्याच्या दुतर्फा स्वागतासाठी थांबलेले नागरिक, औक्षणासाठी थांबलेल्या महिला – भगिनी, त्यांच्यावर होणारी पुष्पवृष्टी, फटाक्यांची आतिषबाजी, आणि एकच नारा “शंकर जगताप तुम आगे बढो, हम तुम्हारे साथ है” या उल्हासित वातावरणात सळसळत्या तरुणाईची निघालेली उर्जावान पदयात्रेच्या माध्यमातून थेरगावकरांनी शंकर जगताप यांच्या विजयासाठी ‘वज्रमूठ’ बांधली आहे.



या पदयात्रेत महिला तसेच तरुण कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. ज्येष्ठ महिलांनी औक्षण करीत, शंकर जगताप यांच्या चेहऱ्यावरून हात फिरवत त्यांना मनापासून विजयासाठी आशीर्वाद दिला. या अनोख्या स्वागताने शंकर जगताप भारावून गेले होते.

थेरगाव येथील पवना नगर पडवळ नगर, दगडू पाटील नगर, श्रीकृष्ण कॉलनी, ड्रायव्हर कॉलनी, हनुमान नगर, गुरुनानक कॉलनी, संदीप नगर, एकता कॉलनी, शिक्षक कॉलनी, नम्रता कॉलनी, साने गुरुजी शाळा, बापूजी बुवानगर, थेरगाव गावठाण परिसरात ही भव्य पदयात्रा काढण्यात आली.

यावेळी निवडणूक प्रचारप्रमुख काळुराम बारणे, माजी नगरसेवक अभिषेक बारणे, माजी नगरसेविका मनीषा पवार, तानाजी बारणे, स्वीकृत नगरसेवक संदीप गाडे, पिंपरी चिंचवड विधानसभा संजय गांधी निराधार समितीचे अध्यक्ष नरेंद्र माने, प्रमोद पवार, विनोद पवार, शिवसेनेचे संभाजी बारणे, वृक्ष प्राधिकरण सदस्य विजय राऊत, दिगंबर पवार, किरण शिंदे, प्रतीक गाडे, युवा नेते अमोल जावळे, शिवसेना संघटिका रितूताई कांबळे, प्रकाश शिरगारे, डॉ. दत्ता देशमुख, हनुमंत बारणे, अतुल घोगरे, रवी भिलारे, सचिन वंजारे, किशोर पारखे, नाना शेंडगे, शंकर पवार, भूषण जावळे, रोहित सरोदे, प्रशांत वाघमारे, अमोल बागुल, प्रशांत सपकाळ, पियुषा पाटील, राजेश राजपुरोहित, अनिता नारळे, सागर बारणे, शुभम बारणे, शंकर खांडगे यांच्यासह इतर मित्र पक्षातील आजी-माजी पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

स्व. आमदार लक्ष्मणभाऊ आणि आमदार अश्विनी जगताप यांच्या आमदार निधीतून थेरगाव परिसरात कोट्यावधी रुपयांची विकासकामे करण्यात आली आहेत. यामध्ये प्रामुख्याने ओपन जिम, वाहतूक बेटांची निर्मिती व सुशोभीकरण, विविध ठिकाणी सार्वजनिक वाचनालय, पिण्याच्या पाण्यासाठी मोठ्या व्यासाची पाईपलाईन, 12 मीटरचा रस्ता विकसित करणे, अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण आणि सिमेंट कॉंक्रीटीकरण या विकासकामांसह थेरगाव येथे बहुउद्देशीय इमारतीची उभारणी आदी कामे ही आमदार निधीमधून करण्यात आली आहेत. तसेच महापालिकेच्या रुग्णालयासाठीही स्व. लक्ष्मण जगताप यांनी यशस्वी पाठपुरावा केला होता. या विकासकामांप्रमाणे भविष्यात थेरगावचा आणखी सर्वांगीण विकास व्हावा यासाठी सर्व थेरगावकरांनी शंकर जगताप यांच्या विजयाचा संकल्प केला आहे.



# मतदारांसाठी निवडणूक आयोग लावणार चौकाचौकात बॅनर

## मतदान टक्का वाढवण्यासाठी नवा फंडा : नागरिकांनी गंभीर होण्याची दाखवण्यात आली गरज

**पिंपरी | प्रतिनिधी**

राज्यातील निवडणुकीच्या अनुषंगाने मतदानाचा टक्का वाढावा, यासाठी आयोगाकडून वेगवेगळ्या प्रकारे जनजागृती केली जाते. पत्रक वाटप समवेत सोशल मीडियावर देखील मतदानासाठी आवाहन केले जाते. मात्र, मतदान करण्याचे आवाहनासाठी पिंपरी चिंचवड शहरामध्ये लावण्यात आलेल्या बॅनरकडे सर्वांचेच लक्ष वेधले जात आहे. इतर वेळी आवाहन करणाऱ्या निवडणूक आयोगाने थेट मतदान राजाचे डोळे उघडतील अशा तीव्र शब्दात त्यांना मतदान प्रक्रियेची दखल घेण्यास भाग पाडले आहे.




यंदाच्या विधानसभा निवडणुका अवघ्या काही दिवसांवरती आल्या आहेत. त्यामुळे सर्वत्र राजकीय वातावरण दिसू लागले आहे. पिंपरी चिंचवड मध्ये तीन विधानसभा असल्याने या ठिकाणी सर्व यंत्रणा महापालिकाअंतर्गत सुरू आहे. दरम्यान, नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीमध्ये मतदानाचा टक्का घसरला होता. यामुळे मतदान वाढवण्यासाठी केलेले प्रयत्न फेल गेल्याचे दिसून आले. त्या साठी करण्यात आलेला खर्च, यंत्रणा आणि मनुष्यबळ देखील निष्क्रिय ठरले.

मात्र आता येणाऱ्या विधानसभा निवडणुकीमध्ये मतदानाचा टक्का वाढवण्याचे मोठे आवाहन राज्यातील निवडणूक आयोगाप्रमाणेच स्थानिक स्वराज्य संस्थेला देखील आहे. त्या अनुषंगाने पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने मतदान राजाला आवाहन करण्यासाठी वेगवेगळ्या पद्धतीने उपाययोजना करण्यात येत आहेत. त्या अनुषंगाने पदफेरी, जनजागृती, कंपन्या व आरोग्य संबंधित आस्थापना या ठिकाणी निवडणूक अधिकारी जाऊन जनजागृती करत आहेत. यासाठी शहरातील सामाजिक संस्था, संघटना आणि काही सार्वजनिक मंडळी देखील एकत्र आलेली आहेत.

त्यातच आता पिंपरी चिंचवड शहरामध्ये वेगवेगळ्या ठिकाणी आणि नागरिकांचे लक्ष वेधून घेता येईल, अशा ठिकाणी बॅनर लावण्यात आले आहेत. त्यामध्ये चक्क मतदारांना यंदाच्या निवडणुकीमध्ये मतदान प्रक्रियेची दखल घेण्यात भाग पाडले आहे. त्या बॅनरवर मी मतदान करणारच, तुम्ही कितीही शिकलेले असू द्या, मत देण्यात टाळाटाळ करत असल्यास सर्व पदवी पाण्यात, जबाबदार नागरिकपणा मतदान करा, मतदान न करणाऱ्यांनी फुकटचे सल्ले देऊ नये , अशा आशयाचे बॅनर पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने विविध ठिकाणी लावण्यात आले आहेत. याप्रकारे शहरातील नागरिकांना मतदान प्रक्रियेमध्ये जास्तीत जास्त सहभागी करून घेण्याचा हेतू आहे.

### त्या बॅनरने चर्चा रंगली सर्वत्र


**» शहरातील मुख्य रस्त्यावर लावण्यात आलेल्या या बॅनरची विविध ठिकाणी मोठ्या प्रमाणात चर्चा सुरू आहे. त्यामुळे हे बॅनर पाहण्यासाठी खास नागरिक त्या ठिकाणी भेट देत आहेत. इतर वेळी राजकीय बॅनर, माहिती नागरिकांचे लक्ष वेधून घेते. मात्र त्यापुढे जाऊन निवडणूक आयोगाने लावण्यात आलेल्या या बॅनरमुळे मतदान न करणाऱ्या नागरिकांना चपराक बसली आहे. त्यामुळे यावेळी मतदान टक्का वाढेल अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.**

# नेत्यांनी भरला 17 कोटींचा मिळकतकर

## विधानसभा निवडणुकीसाठी ना हरकत प्रमाणपत्राच्या नावाखाली महापालिकेने केली वसुली

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील अनेक मिळकतदारांची थकबाकी कोट्यवधी रुपयांमध्ये आहे. महापालिकेकडून कर वसुली केली जाते. मात्र अनेकदा राजकारण्यांकडून मिळकतकर भरण्याकडे दुर्लक्ष केले जाते. तसेच थकबाकी वसूल न करण्यासाठी राजकीय दबाव टाकला जातो. मात्र आता विधानसभा निवडणुकीचा उमेदवारी अर्ज भरण्यासाठी ना हरकत प्रमाणपत्र (एनओसी) मिळण्यासाठी उमेदवारांनी आपली थकबाकी भरल्याची माहिती समोर आली असून महापालिकेच्या तिजोरीत सुमारे १७ कोटी रुपये मिळकतकर जमा झाला आहे.




विधानसभा निवडणुकांसाठी इच्छुक असलेल्या आणि उमेदवारी निश्चित असलेल्या इच्छुकांकडून उमेदवारी अर्ज दाखल करताना कोणतीही कर थकबाकी नसल्याबाबतची एनओसी सादर करावी लागते. त्यामुळे संबंधित उमेदवाराकडे असलेली कर थकबाकी भरण्याशिवाय कोणताही पर्याय राहात नाही. एरवी चार ते पाच वर्षे कर थकविणारे हे उमेदवार निवडणुकीसाठी महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी मागणी करूनही कर थकबाकी न भरणाऱ्या या राजकारण्यांनी स्वत:हून महापालिकेत कर भरल्याचे महापालिकेच्या वसुली पथकाच्या कर्मचाऱ्यांनी सुस्कारा सोडला आहे.

विधानसभा निवडणूक लढविण्यासाठी उमेदवारांना सुमारे ३५ प्रकारचे ना-हरकत प्रमाणपत्रे ( एनओसी) अर्जासोबत द्याव्या लागतात. त्यात मिळकतकर, पाणीपुरवठा, महावितरण अशा शासकीय कार्यालयांच्या “एनओसी’चा समावेश असतो. पुण्यात अनेक राजकीय नेत्यांच्या व्यावसायिक तसेच निवासी मिळकती आहेत.

तर, इच्छुक उमेदवारांच्याही मिळकती असतात. त्यामुळे पालिकेचा कर भरल्याशिवाय या “एनओसी’ मिळत नाहीत. यासाठी पालिकेचा कर भरणे अत्यावश्यक आहे. या थकबाकी वसुलीसाठी आलेल्या कर्मचाऱ्यांना अनेक नेत्यांकडून दबाव टाकला जातो. तसेच मिळकतकर भरण्याकडे दुर्लक्ष केले जाते. तसेच कर भरण्यासाठी महापालिकेने नोटीस काढल्यास अधिकाऱ्यांवर राजकीय दबाव टाकला जातो. राज्यातील काही बड्या नेत्यांची एक ते दोन कोटींची; तर काहींची चार ते पाच कोटींची थकबाकी होती. त्याबाबत महापालिकेने नोटीस काढल्यास अधिकाऱ्यांना धमकावल्याचे प्रकार काही महिन्यांपूर्वी समोर आले होते.

महापालिकेत समाविष्ट झालेल्या गावांमध्ये पायाभूत सुविधांना वानवा आहे. त्यामुळे महापालिकेने कोणतीही कर आकारणी करू नये, अशी मागणी येथील ग्रामस्थांनी केली होती. ऐन निवडणुकीच्या तोंडावर राज्य सरकारने समाविष्ट झालेल्या गावांच्या मिळकतकर वसुलीस स्थगिती दिली होती. परंतु हा निर्णय तत्काळ लागू होणार नसल्याचा दावा महापालिकेचे अधिकारी करत असले तरी गावकरी मिळकरकर भरणार नाहीत हे आता स्पष्ट झाले आहे. त्यामुळे महापालिकेच्या मिळकतकराची उत्पन्नवाढीला एकप्रकारे ब्रेकच लागला आहे. महापालिकेस ऑक्टोबर अखेरपर्यंत १७२५ कोटींचा महसूल मिळाला आहे, तर ३१ मार्च अखेरपर्यंत आणखी ६०० कोटींचे उत्पन्न मिळण्याची शक्यता आहे. त्यामुळे यंदा पालिकेस २६०० कोटींचे उत्पन्न मिळणे अपेक्षित असताना पालिकेच्या उत्पन्नाचा गाडा २३०० ते २३५० कोटींवरच थांबण्याची चिन्हे आहेत.

### समाविष्ट गावांमधील मिळकतकर थकबाकी 500 कोटी...

**» नव्याने समाविष्ट झालेल्या गावांमधील मिळकतदारांना महापालिकेच्या मिळकत कर विभागाने कर आकारणी केली आहे. महापालिकेकडून शहरासह समाविष्ट गावांमधील मिळकतकर थकबाकी वसुली दरवर्षी नोव्हेंबर महिन्यापासून थकबाकी वसुलीस सुरुवात करते. महापालिकेत नव्याने समाविष्ट झालेल्या गावांमधील मिळकतकराची थकबाकी ५०० कोटींवर आहे. ही थकबाकी वसुलीसाठी महापालिकेने नियोजन केले होते. मात्र, सहा महिन्यांपूर्वी झालेल्या लोकसभा निवडणुकीवेळी शासनाने ११ गावांमधील शास्तीकर वसुलीला स्थगिती दिली. त्यानंतर २३ गावांमधील नागरिकांनी महापालिकेचा कर जास्त असल्याने तो कमी करण्याची मागणी केली. त्यामुळे ऐन विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर शासनाने महापालिकेस आदेश देत या गावांतील सरसकट करवसुली थांबविण्याचे आदेश दिले आहेत. याशिवाय कररचनेची फेरतपासणी करून ग्रामपंचायत कराच्या दुप्पट मिळकतकर असू नये, अशा सूचना दिल्या आहेत. त्यामुळे महापालिकेची आर्थिक कोंडी झाली आहे.**

---

# एसटीच्या पुणे विभागाला मिळणार 150 नव्या कोऱ्या बस

## दोन महिन्यांनी स्वमालकीच्या गाड्या होणार दाखल : नवीन दीडशे ई-बस नुकत्याच दाखल

**पुणे | प्रतिनिधी**

एसटीच्या पुणे विभागाच्या ताफ्यात आगामी दोन महिन्यांच्या काळात 150 नव्या इंधनावरील स्वमालकीच्या बस दाखल होणार आहेत. या बसमुळे प्रवाशांचे वेटिंग, गर्दीतून होणारा कसरतीचा प्रवास टळणार असून, त्यांना दिलासा मिळणार आहे.



एकेकाळी डबघाईला आलेल्या लाल परीने आता कात टाकायला सुरुवात केली आहे. विविध प्रकारच्या नव्या अत्याधुनिक यंत्रणा असलेल्या गाड्या महामंडळाच्या ताफ्यात दाखल होत आहेत. त्यामुळे एसटी प्रवासाकडे प्रवाशांचे पुन्हा आकर्षण वाढले आहे. पूर्वी लांब पल्ल्याचा प्रवास म्हटला की, प्रवासी एसटीच्या लालपरीला पसंती देत. मात्र, मध्यंतरीच्या काळात एसटीच्या गाड्यांची अवस्था खूपच दयनीय झाली होती.

अनेक ठिकाणी बस जुन्या झाल्याने त्यांची संख्या कमी झाली. त्यामुळे प्रवाशांना तासन्तास वेटिंग करायला लागायचे. त्यामुळे प्रवासी इतर पर्यायांकडे वळले. त्यातच खासगी बसचा पर्यायदेखील निवडला होता. परंतु, एसटीच्या ताफ्यात येत असलेल्या नव्या बसमुळे कमी झालेले प्रवासी पुन्हा एसटीकडे वळले आहेत. लांबपल्ल्याचा प्रवास म्हटले की, पुन्हा एसटी प्रवासाला प्रवासी पसंती देत आहेत.

### पुणे विभागातील या आगारांना होणार वाटप

**» एसटीच्या पुणे विभागात 14 आगार आहेत. त्या आगारांना त्यांच्या मागणीनुसार नव्या बस गाड्यांचे वाटप होण्याची शक्यता आहे. यात इंदापूर, तळेगाव, राजगुरुनगर, पिंपरी-चिंचवड, मंचर, शिवाजीनगर (वाकडेवाडी), शिरूर, भोर, दौंड, स्वारगेट, नारायणगाव, बारामती आणि बारामती एमआयडीसी, सासवड या आगारांना नव्या गाड्यांचे वाटप होण्याची शक्यता आहे.**

> नव्या स्वमालकीच्या दीडशे बस पुणे विभागाच्या ताफ्यात दाखल होणार आहेत. या तमिळनाडूस्थित कारखान्यात बनवलेल्या अशोक लेलँड कंपनीच्या इंधनावरील बस असतील. या बस आगामी दीड ते दोन महिन्यांच्या कालावधीत एसटीच्या पुणे विभागात दाखल होतील. यापूर्वी नवीन इलेक्ट्रिकवरील शिवाई आणि शिवनेरी अशा एकूण 150 बस पुणे विभागाच्या ताफ्यात दाखल झाल्या आहेत.
>
> **- प्रमोद नेहूल, विभाग नियंत्रक, एसटी, पुणे विभाग.**